# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. ई-मेल- msbnpe@gmail.com ,दुरध्वनी : ०२२.२२६२०३६०

**MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION**

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai-400 001
E-mail- msbnpe@gmail.com, Telephone - 022-22620360


क्र. म.रा.शु.व. प.शि .मं /मुल्यमापन/ ७५ /२०१८ दि.२२-६-२०१८

प्रती,

प्राचार्य,

सर्व सलग्न ए.एन.एम.व जी.एन.एम संस्था.

विषय:- **अंतर्गत मूल्यमापन गुणांची नोंद व परिक्षा नोंदणी व परिक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने करणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ मार्फत चालू शैक्षणिक वर्षापासून मास्टर रोटेशन प्लॅन प्रमाणे ए.एन.एम व जी.एन.एम. कोर्सच्या प्रथम वर्ष परिक्षांसाठी अंतर्गत मुल्यमापन गुंण देताना दोन टर्ममध्ये परिक्षा घेवून गुण देण्याची पध्दत ठरविण्यात आली आहे. दोन्ही परिक्षांच्या गुणांची सरासरी मिळून एकूण गुण गृहीत धरण्यात येतील. या शैक्षणिक वर्षासाठी अंतर्गत मुल्यमापन गुणांसाठी सदर दोन युनिट परिक्षांच्या गुणांची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करावी लागणार आहे.

ए.एन.एम व जी.एन.एम. प्रथम वर्ष परिक्षासाठी त्या परिचर्या प्रशिक्षण संस्थेतील प्राचार्यांनी प्रथम परिक्षा वर्ष (Exam Year) निवडावे त्यानंतर त्या उमेदवाराचे नोंदणीकृत (Enrolled) वर्ष निवडून उमेदवारांच्या पी.आर.एन.क्रमांकानुसार त्या उमेदवाराचे पहिल्या युनिटच्या व दुस-या युनिटच्या सर्व विषयाच्या अंतर्गत मुल्यमापन गुणांची नोंद ऑनलाईन पध्दतीने करावी.

<u>विद्यार्थी परिक्षा नोंदणी</u> : अंतर्गत मुल्यमापन गुणांची नोंद झाल्यानंतर परिक्षा नोंदणी (Exam Enrollment) हा अर्ज सर्व विद्यार्थ्याचा भरावयाचा आहे विद्यार्थी पी.आर.एन. क्रमांकानुसार परिक्षा नोंदणी करावयाची आहे.

<u>विद्यार्थी परिक्षा अर्ज</u> : विद्यार्थी परिक्षा नोंदणी झाल्यानंतर सर्व विद्यार्थाची परिक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने पी. आर. एन. क्रमांक टाकून अर्ज करावयाचे आहेत.

<u>परिक्षा फी भरण्याबाबत</u> : परिक्षा फी भरण्यासाठी पेमेंन्ट मेनू मध्ये जाऊन सर्व सुचना वाचून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करने.संस्थेच्या पोर्टलमध्ये .

ज्या संस्था उमेदवारांचे अंतर्गत मुल्यमापन गुणांची नोंद दिनांक २३ / ०६ / २०१८ ते २७/०६/२०१८ करणार नाहीत अशा उमेदवारांना महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ परिक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी त्यामुळे विद्यार्थांच्या होणा-या नुकसानीस संस्था जबाबदार राहील.

डॉ.पी.एच. शिनगारे
संचालक
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत,चौथा मजला,सेंट जॉर्जेस रूग्णालय आवार, पी.डी.मेलोरोड, फोर्ट, मुंबई - ४०० ००१. ई-मेल- msbnpe@gmail.com ,दुरध्वनी : ०२२.२२६२०३६०

**MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION**

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St.Georges Hospital Campus, P.D'Melo Road, Fort, Mumbai-400 001
E-mail- msbnpe@gmail.com, Telephone - 022-22620360


क्र.मरासुपशिम/नोंदणी/७६/२०१८ दिनांक : २२.६.२०१८

सुचना

प्रति,
सर्व संस्थाचालक/प्राचार्य
जी.एन.म. महाविदयालये,
महाराष्ट्र राज्य

विषय : जी.एन.एम. (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाच्या परिक्षा पुढे ढकलण्याबाबत.

सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षातील जी.एन.एम. (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाच्या परिक्षा महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैदयक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणार आहे. त्यानुसार या परिक्षेचे वेळापत्रक मंडळाच्या संकेतस्थळावर या पुर्वीच प्रसिध्द करण्यांत आलेले आहे. विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी एनरोलमेंटसाठी दिनांक २२ जुन २०१८ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली होती. त्यामुळे ३ जुलै ते ६ जुलै २०१८ दरम्यान घेण्यात येणा-या जी.एन.एम. (प्रथम वर्ष) अभ्यासक्रमाच्या परिक्षा विदयार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या बाबतची अधिकृत सुचना संकेतस्थळावर नविन वेळापत्रकासह लवकरच सर्वांना कळविण्यात येईल. सर्व संस्थांनी संबधित विदयार्थ्यांच्या निदर्शनास सदरहू बाब आणून दयावी.

(डॉ.प्रविण शिनगारे)
संचालक
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ